


# THE SPIRE OF JUSTICE



जिल्हा न्यायालयाच्या इमारतीचे श्री. हेब्बाळकर वकील यानी रेखाटलेले जलचित्र.



मनोऱ्याची आतील वैशिष्ट्यपूर्ण बांधणी



मुख्य इमारतीतील कोर्ट हॉल

कोल्हापूर जिल्हा न्यायालय

# शतसांवत्सरिक महोत्सव

## स्मरणिका

कोल्हापूर डिस्ट्रिक्ट बार असोशिएशन

प्रकाशन

१९६८

# प्रास्ताविक व ऋण निर्देश

कोल्हापूर जिल्हा न्यायालयाच्या शतसांवत्सरिक महोत्सवाची ही स्मरणिका वाचकांच्या हाती देण्यात आम्हास अतिशय आनंद होत आहे.

वास्तविक महोत्सवाचे दिवशीच म्हणजे दि. ३० एप्रिल १९६८ ला महोत्सव समारंभाचे अध्यक्ष न्या. एस्. पी. कोतवाल, महाराष्ट्र हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश, यानी औपचारिकरीत्या ही स्मरणिका प्रकाशित झाल्याचे जाहीर केलेलेच आहे. परंतु महोत्सवानिमित्त घेतलेली छायाचित्रे व महोत्सवाचा वृत्तांत इत्यादींचा समावेश करण्याच्या दृष्टीने हे संपूर्ण प्रकाशन थोडेसे उशीरा होत आहे.

महोत्सव समारंभ साजरा करण्यात व ही स्मरणिका तयार करण्यात अने–कांचे तरतऱ्हेचे सहाय्य झाले आहे. त्या सर्वांचाच नामनिर्देश करणे हे अशक्य आहे. तथापि ज्यांची मदत विशेष झाली त्यांचा उल्लेख करणे हे आमचे कर्तव्य होय.

या समारंभाचे अध्यक्ष म्हणून येण्याचे न्या. एस्. पी. कोतवाल यानी कबूल केले म्हणून तर या समारंभास जोराची चालना मिळाली व विशेष महत्व प्राप्त झाले हे निःसंशय होय. न्यायमूर्तीनी येथवर येण्याची तसदी घेतली, समारंभाचे अध्यक्षपद भूषविले व बहुमोल मार्गदर्शन केले याबद्दल आम्ही त्यांचे सदैव ऋणी राहू.

न्या. एम्. एस्. आपटे आमचे विनंतीस मान देऊन समारंभास हजर राहिले व आमचा सत्कार स्वीकारला याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

श्री. रामराव आदिक यानी आमच्या स्नेहसम्मेलनाचे अध्यक्षपद आपुलकीने स्वीकारून व मार्गदर्शन करून आम्हास उपकृत केले आहे.

आमचे पूर्वीचे जिल्हा न्यायाधीश श्री. आर. के. जोशी यानी महोत्सवाची कल्पना निघाल्यापासून जें प्रोत्साहन व सहाय्य दिले ते जर झाले नसते तर या समा-रंभाची कल्पना मूर्त स्वरुपात कदाचित् आलीहि नसती इतक्या आत्मीयतेने त्यांची मदत झाली हे कृतज्ञतापूर्वक नमूद करतो. समारंभापूर्वी थोडेच दिवस आधी त्यांची बदली झाल्याने ते समारंभाची पूर्तता करू शकले नाहीत हा भाग वेगळा.

सध्याचे आमचे डि. जज् श्री. पी. जी. कर्णिक हे समारंभापूर्वी अगदीच थोडें दिवस आधी आले असताहि आमच्या सुरू असलेल्या कार्यात तात्काल संपूर्णपणे सहभागी होऊन त्यानी कार्याची सांगता केली हेही नमूद करण्यास आम्हास विशेष आनंद वाटतो. असि. जजीस् श्री. आर. पी. साळवी व श्री. जी. एस्. नांदे यानीहि पहिल्यापासून अखेरपर्यंत आपुलकीने आम्हास सहाय्य केले. या सर्वांचे आम्ही फार आभारी आहोत.

ही स्मरणिका तयार होण्याच्या कामी जिल्हा कोर्टाचे रेकॉर्ड, जिल्हा–धिकाऱ्यांचे रेकॉर्ड, नगरवाचन मंदिर अशा अनेक ठिकाणाहून मदत झाली. अने–कानी फोटो पाठविले; तऱ्हतऱ्हेची माहिती दिली. त्या सर्व संबंधितांचे आम्ही आभारी आहोत.

आमच्या विनंतीस मान देऊन या स्मरणिकेसाठी आठवणी लिहून पाठविल्या त्या सर्वांना आमचे धन्यवाद.

ज्या संस्थांनी व व्यक्तींनी आम्हास देणग्या देऊन उपकृत केले त्यांचा नाम-निर्देश या स्मरणिकेत स्वतंत्र केलेलाच आहे. त्यांचे पुन: आभार मानतो.

आमचे मित्र श्री. डी. डी. बराले व धी कोल्हापूर शुगर मिल्स लि. यानी आपल्याकडील मोटारी मुख्य पाहुण्याकरिता वापरावयास देऊन आम्हास उपकृत केले.

या स्मरणिकेची सजावट वगैरे व सुबक छपाई ज्यानी केली त्यांचा उल्लेख पहिल्या मुखपृष्ठावर केलेला आहे. त्यानी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार.

हा समारंभ पुरा करण्यात व ही स्मरणिका तयार होण्यात माझे अनेक सहकारी मित्र, कर्मचारी वगैरेनी अविश्रांत श्रम घेतले त्यांचा नामोल्लेख या स्मरणिकेत वेगवेगळ्या ठिकाणी आलेला आहे. ही सर्व संबंधीत मंडळी असली तरी त्यांचे आभार मानल्याशिवाय मला राहवत नाही.

दि. १ जून १९६८<br>
टाऊन हॉल, कोल्हापूर.

**न. वि. जोशी**<br>
अध्यक्ष,<br>
बार असोशिएशन व महोत्सव समिती

# अनुक्रमणिका


पान नं.

**भाग १**

कोल्हापूरच्या न्यायालयाची गेली शंभर वर्षे ... १
लेखक : ग. वि. चिखलीकर

कोल्हापुरांतील वकिली व वकील ... ८
लेखक : ग. रं. हळदीकर

जुन्या दफ्तरांतील शोध व बोध ... १७
लेखक : ग. रं. हळदीकर

Shahaji Law College, Kolhapur ... २०
N. A. Nandrekar

वट्टहुकमाच्या साम्राज्याची शतसंवत्सरी ... २३
लेखक : बाबूराव जोशी

कोल्हापुरांतील न्यायाधीशांची परंपरा ... २७
लेखक : ग. रं. हळदीकर

**भाग २**

**कोल्हापूरच्या न्यायालयासंबंधी विविध आठवणी ... ३४ ते ४१**

लेखक : पं. श्री. दा. सातवळेकर ... ३४
न्या. व्ही. ए. नाईक ... ३५
श्री. रा. के. रानडे ... ३६
श्री. एम्. व्ही. परांजपे ... ३६
श्री. एन्. एस्. श्रीखंडे ... ३८
श्री. व. शां. देसाई ... ३९
श्री. वसंतराव देशमुख ... ४०
श्री. टी. आर. कुलकर्णी ... ४१

कवि बाबूराव टिळक आज असते तर ... ४१

**भाग ३**

**विविध विषय**

काव्य : न्यायदान : पान १५ वंदन : पान ३२

डिस्ट्रिक्ट बार असोशिएशनचे अध्यक्ष ... २८

कोल्हापुरांतील सरकारी वकील ... २९

कोल्हापुरांतील न्यायाधीशांची यादी ...

महोत्सवास आलेले शुभ संदेश ...

आमचे देणगीदार ...

शतसांवत्सरिक सोहाळचाचे सौरभ पराग ...

स्मृतिकालिन न्यायव्यवस्था ...

पक्षकार व साक्षीदार यांची मनोवृत्ति ...

महोत्सवाच्या कार्यकारी समित्या ...

रुचिपालट ५, ९, १३, १६,

**भाग ४**

**छायाचित्रे**

न्या. महादेव गोविंद रानडे अर्पण प

सर न्या. छगला यांची कोल्हापूर भेट ८

कोल्हापूर संस्थानचे न्यायाधीश

कोल्हापुरचे वरिष्ठ न्यायाधीश

पंचावन्न वर्षांपूर्वीचा वकिलांचा एक मेळावा

न्या. चैनानी यांची कोल्हापूर कोर्टास भेट १६-

न्या. कोतवाल यांचे समवेत न्यायाधीश व कर्मचारी

न्या. कोतवाल यांचे समवेत वकील वर्ग

कांही न्यायाधीश व वकील यांचा मेळावा

कोल्हापूर संस्थानचे दोन छत्रपति २४-

जुन्या निवाडचाचे कांही भाग

न्यायालयात वापरले गेलेले विविध शिक्के

कोल्हापुरचे फुल कौन्सिल व पूर्वीचे न्यायाधीश

कोल्हापूरचे सुपुत्र ३२-

काही न्यायाधीश व कांही वकील

कांही दिवंगत वकील

प्रयाग संमेलन

कोल्हापूर संस्थानच्या
जिल्हा न्यायालयाचे पहिले न्यायाधीश
मुंबई हायकोर्टाचे थोर न्यायमूर्ति
आधुनिक भारताचे एक महान् शिल्पकार


**न्या. महादेव गोविंद रानडे**

यांच्या पुण्यस्मृतीस
ही स्मरणिका सादर अर्पण !

*

न्या. महादेव गोविंद रानडे






न्यायमूर्तींची स्वाक्षरी
( अपील नं. १/१८६७ च्या निवाडयावरील )

# आदर्श न्यायाधीश

शास्त्रज्ञः कपटानुसारकुशलो वक्ता नच क्रोधन- ।
स्तुल्यो मित्रपरस्वकेषु चरितं दृष्ट्वैव दत्तोतरः ॥
क्लीबान्पालयिता शठान्व्यथयिता धर्म्यो न लोभान्वितो ।
द्वार्भावे परतत्वबद्धहृदयो राज्ञश्च कोपापहः ॥१॥

मृच्छकटिकम्–शूद्रक.

[ So a judge indeed has to be conversant with the Law; expert in tracing out fraud; absolutely impartial towards friends, enemies and his own relatives; giving judgment only after a thorough investigation; a protector of the weak.; a harasser of rouges; acting according to the diction of religion; not falling a prey to greed and determined to find out the whole truth by every possible means and thus pacifies the wrath of the King-Administrator. ]

शूद्रकाने न्यायाधीशाचे केलेले हे वर्णन वाचून वाटते की **न्यायमूर्ति रानडे** यांच्यासारखी आदर्श व्यक्ति कवीच्या डोळ्यापुढे असावी.

# कोल्हापूरच्या न्यायालयाची गेली १०० वर्षे

लेखक : गणेश विठ्ठल चिखलीकर

*● लेखक परिचय : बी.ए.,एलएल्.बी. वकील. हौशीने अनेक नाटके लिहिली. पैकी काही नभोवाणीवर व रंगभूमीवर अवतरली. 'अभिनव मराठी ज्ञानकोश'चे संपादक मंडळावर काही वर्षे काम केले. त्यावून निर्माण झालेल्या संशोधनाच्या आवडीतून हा लेख.*

**१५** ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. पाठोपाठच संस्थानांच्या विलिनीकरणाची मोहिम धडाक्याने सुरू झाली. त्याच ओघात आमचे कोल्हापूर संस्थान १ मार्च १९४९ रोजी मुंबई राज्यात अधिकृतपणे विलिन झाले.

कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील अग्रेसर संस्थान होय. **छत्रपति शिवाजी** महाराजांच्या गादीचा वारसा फक्त या **करवीर** राज्यातच कायम राहिला म्हणून या संस्थानाला जसा एक आगळा दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त झाली, त्याचप्रमाणे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कलाविषयक अशा अनेकविध क्षेत्रातील वैशिष्ट्यामुळेहि कोल्हापूर संस्थान हे आघाडीवर राहिले. न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने पाहता कोल्हापूरला स्वतःचे **हायकोर्ट व सुप्रीम कोर्ट** होते, इतकेच नव्हे, तर कायदे करणारी स्वतंत्र लोकनियुक्त अशी **विधान सभाहि** कोल्हापुरात होती. पण विलिनीकरणानंतर कोल्हापूरला महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा एवढाच दर्जा प्राप्त झाला. साहजिकच जिल्हा न्यायालय हेच येथील आता वरिष्ठ न्यायालय होय.

## जिल्हा न्यायालयाची प्रतिष्ठापना

या जिल्हा न्यायालयाचा मागोवा घेता असे दिसून येते की, कोल्हापूर संस्थानात स्वतंत्र रीतीने जिल्हा कोर्ट हे शंभर वर्षांपूर्वी सन १८६७ साली स्थापन झाले. अर्थात त्यापूर्वी न्यायकोर्टस् नव्हतीच असे नाही. सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी १८४४ साली अशी कोर्टस् स्थापन झाल्याचा दाखला मिळतो. तसेच जिल्हा न्यायालयाचे विशिष्ट अधिकार, म्हणजे अपीले ऐकणे, मोठ्या फौजदारी गुन्ह्यांचा इन्साफ करणे इत्यादि अधिकार १८६७ पूर्वी वापरले जात होते; पण ते अधिकार संस्थानचे राजे ( कोणातरी तज्ञाच्या सल्यानुसार अगर सल्ला झुगारूनहि ) वापरीत. एका व्यक्तीची स्वतंत्र नेमणूक करून जिल्हा न्यायाधिशाचे अधिकार स्वतंत्र रीतीने दिले गेले म्हणजे जिल्हा कोर्टाची खऱ्या अर्थाने स्थापना झाली ही घटना येथे शंभर वर्षापूर्वी १८६७ मध्ये घडली. आणि म्हणून येथील न्यायपद्धति व त्यांतील स्थित्यंतराचा हा त्रोटक इतिहास सादर केला जात आहे.

हा इतिहास खालील विशिष्ट कालखंडाच्या व स्थित्यंतराच्या अनुरोधाने पाहिला पाहिजे.

१) न्यायकोर्टस् अस्तित्वात येण्यापूर्वीची म्हणजे १८४४ पूर्वीची न्यायपद्धति. २) १८४४ ते जिल्हा न्यायकोर्ट स्थापनेपर्यंतची स्थिति. ३) १८६७ ते हायकोर्ट स्थापनेपर्यंतचा काल व ४) १९३१ ते विलिनीकरणापर्यंतच्या घडामोडी.

**१**

## प्राचीन न्याय व्यवस्था

या कालात जशी न्यायकोर्टस् नव्हती तशीच कोणती प्रस्थापित अशी सुसूत्र न्यायपद्धतीहि नव्हती. खेडेगावात पाटील व शहरात मुलकी कामगार हे न्यायाचे काम पहात

असत. कोणी फिर्याद केली म्हणजे कुलकर्ण्याच्या मदतीने पाटील तो वाद आपसात समजुतीने तोडण्याचा प्रयत्न करी. तेणेकरून कज्जाचा निकाल झाला नाही तर पंचायतीकडे वाद सोपवीत.

पंचायतीमध्यें तीन, पांच किंवा कित्येकवेळी गावातील सर्व प्रमुख वृद्ध मंडळीहि असत. पंचाइती करण्यापूर्वी दोन्ही बाजू पंचांना कज्जाचा निकाल करण्यास अधिकार देण्या-करिता लेख लिहून देत त्यास कबुलायत किंवा ऐकटपत्र म्हणत. कधी कधी पंचाइतीचे काम सरकारी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली चाले. पंचांपुढे प्रत्येक बाजू आपले लेखी म्हणणे देत असे त्यास करिणा म्हणत. त्यानंतर पंच दोन्ही बाजूचे तोंडी म्हणणे ऐकून घेत व जरूर तर पुराव्याकरिता साक्षीदारांना बोलावीत. परगावी साक्षीदार असल्यास त्यास पत्रद्वारेसुद्धा आपले म्हणणे कळविता येत असे. पंचायती कधी कधी पक्षकारांच्या जबान्या घेई, उलट तपासणी करी, तोंडी व दस्तऐवजी पुरावा असेल तर त्याचा विचार करी आणि पुढे आलेल्या पुराव्यावरून देशचालीप्रमाणें निकाल करी. त्यावेळचा न्याय प्रामुख्याने व्यवहार, रूढी, नीति आणि धर्मशास्त्र यावर आधारलेला असे. पंचांच्या निकालास पंचायतनामा, महजरपत्र, निवाडा पत्र किंवा फडशा म्हणत. या निकालात उभयतांचे म्हणणे, पुराव्याचे विवेचन व अखेर परिणाम याची नोंद असे. पंचांचा निकाल उभय पक्षकारांवर बंधनकारक असे. ज्या पक्षकारांचे विरुद्ध निकाल झाला असेल त्याने तो वाद पुन्हा उकरून काढू नये म्हणून त्याच्याकडून लेख लिहून घेत त्यास 'खूटपत्र' असे म्हणत. पंचाच्या निका-लाची अम्मलबजावणी करण्यास सरकारी अम्मलदारांची मदत मिळू शके. कधी कधी खटल्याचा निकाल करण्याकरिता 'दिव्य'ही करून घेत. उदा. उकळत्या तेलातून लोखंडाचा तुकडा हाताने काढणे किंवा गंगाजळ हातात घेऊन पक्षकाराने शपथ घेणे, देवावरील फूल उचलून देणे, देवाच्या पायावर हात मारणे इत्यादि. पंचायतीकडे काम सोपविण्यास कोणी नाकबूल केले तर त्याचा पक्ष लबाडीचा आहे असे समजत व त्याचा दावा रद्द होई. साधारणत: पंचाचा निकाल अखेरचा असे. परंतु कित्येक विशेष खटल्यात पुन्हा चौकशी करीत.

फौजदारी गुन्ह्यांचा न्याय करण्यास पंचायतीचा क्वचितच उपयोग करीत. खेड्यामध्ये किरकोळ गुन्ह्यांची चौकशी पाटील करी. पक्षकारांची व साक्षीदारांची तोंडी तपासणी करून तो गुन्हेगारांना दंड, खोडा घालणे, चावडीत अटकेत ठेवणे इत्यादि शिक्षा करीत. पाटलावर मामलेदार किंवा कमावीसदार असत. ते खून, दरवडा, चोरी, घरफोडी वगैरे गुन्ह्यांची चौकशी करीत आणि अखेर निकालाकरिता काम महाराजांकडे पाठवीत किंवा कधी कधी असे खटले न्यायाधीशाकडेही चौकशीकरिता पाठवीत.

हुजूर मर्जीनुसार कोणताही गुन्हा दंडावर भागे. कधी कधी खून झालेल्या इसमाचे वारसास ज्याने खून केला त्याचेकडून नुकसान भरपाईदाखल जमीन देववीत त्यास 'खूनकाट' म्हणत. हल्लीप्रमाणें त्यावेळी तुरुंग नव्हते. अपराध्यास किल्ल्यावर कोंडून ठेवीत. खुद्द कोल्हापुरात शहराच्या मध्यभागी रंकोबाचे देवळाजवळ काही अंधार कोठड्या व तळघरे होती त्यात टाकीत असत. फाशी देणे, डोके उडविणे, तोफेच्या तोंडी देणे, कडेलोट करणे, हत्तीच्या पायी देणे, सुळावर चढविणे इत्यादि शिक्षा प्रचारात असत. या शिवाय धिंड काढण्याची शिक्षाही देण्यात येत असे.

अशा परिस्थितीत न्यायाचा मामला महाराजांच्या मर्जीतील काही थोड्या बगलबच्च्यांच्या लहरीवर चालला होता. खेड्यात पाटील व तालुक्यात ठाण्यावर मामलेदार शिरजोर झाले होते. राजसत्ता कमकुवत दुबळी बनत चालली होती. सन १८४५ साली मि. रिव्हज साहेबाने तत्कालीन राज्य व्यवस्थेचे खालीलप्रमाणे वर्णन केले आहे.

"कोल्हापूरची न्याय करण्याची पद्धत जरी हिंदु शास्त्रास अनुसरून आहे तथापि तिचा अम्मल अशारीतीने होतों की, हरएक प्रकारचा अन्याय व जुलूम होण्यास जागा राहते. हुजूरच्या काही बीनमोसमी कामगारांच्या लहरीवर न्याय करण्याचे काम सर्वस्वी अवलंबून असे. तालुक्यात मामलेदार व त्याखालीं खेड्यात पाटील हे मोठे सत्ताधीश असून ते करतील ती पूर्व दिशा असे. तसेच राज्यकारभार इतका ढिला व पुळपुळीत झाला होता की, त्यात फारसे पाणी राहिले नव्हते. यामुळे राज्य खरोखर लयास जावयाचे परंतु हिंदुराज्य शैलीत कधी नाश न पावणारी अशी खेडी व गांवे यांच्या बंदोबस्ताकरिता केलेली जी व्यवस्था ती कायम राहिल्यामुळे राज्य बचावले असे खुशाल म्हणावे."

२

## नव्या मनूचा उदय

बुवासाहेब महाराजांच्या दुर्वर्तनामुळे ब्रिटिश सरकारास वेळोवेळी हस्तक्षेप करावा लागला. वेळोवेळी तह केले आणि ते मोडले. व अखेर १८२९ च्या तहाने करवीर राज्यावर कारभारी नेमण्याची मुखत्यारी ब्रिटिश सरकारने आपणाकडे घेतली व त्या कारभाऱ्याच्या सल्ल्याप्रमाणे वागण्याचे महा-राजानी कबूल केले. परंतु या ना त्या कारणाने ही गोष्ट लांबणीवर पडत जाऊन अखेर १८३७ मध्ये बुवासाहेब छत्रपति मरण पावले आणि त्यांचे चिरंजीव बाबासाहेब व चिमासाहेब अज्ञान असल्याने कारभार ब्रिटिशांच्या देखरेखी-खाली आला. त्यानी १८२९ च्या तहाअन्वये दाजी कृष्ण पंडीत यास १८४३ साली कोल्हापुरला स्टेट कारभारी म्हणून व राज्य कारभार पाहण्याकरिता व राज्याचे देखरेखी-करिता मे. ग्रॅहॅम यांची पोलिटिकल सुपरिटेंडेंट म्हणून नेमणूक झाली (१८४४) व तेथूनच कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याच्या कालखंडाला सुरवात झाली. नवा मनू

उदयास येऊ लागला. या अगोदरच १८४२ साली सतीची चाल बंद केली गेली व १८४३ साली मुलांची विक्री करणे बेकायदेशीर ठरविण्यात आले.

## १८४४ ते ४८

दाजी कृष्ण पंडितानी प्रथम एकवीस मामल्यांची संख्या कमी करून कोल्हापूर प्रांताचे आठ भाग पाडले. त्यात करवीर, पन्हाळा, शिरोळ, आळते, गडहिंग्लज, भुदरगड हे सहा पेटे किंवा तालुके व रायबाग व कटकोळ हे दोन महाल अगर ठाणी होती.

मामल्याची ठाणी गडावरून खाली आणली व त्याकरिता पुढे पेटाचे गावात नवीन इमारती बांधल्या. इ. स. १८७६–८० चे सुमारास प्रत्येक पेटाचावर दरमहा १०० रुपये पगाराचा मामलेदार व ठाण्यावर महालकरी ४०–४५ रु. वर असे. ( तसेच यानंतर पुढे मामल्याची ठाणी गडावर होती ती मोडून वरील गांवी सपाट ठिकाणी आणली. ) मामलेदार याजकडे दिवाणी व फौजदारी अधिकार दिले. या शिवाय कोल्हापुरास दरमहा २०० रुपये पगाराचा एक न्यायाधीश व दरमहा ५० रुपये पगारावर एक कोतवाल नेमला.

पुढे १८४८ साली कोल्हापुरात दरमहा १५० रुपयांचा एक सदर अमीन व शिरोळ व कडगांव येथे दरमहा ७५ रु. पगारावर दोन मुन्सफ कोर्टाची नियुक्ति झाली व मामलेदार यांचेकडील दिवाणी कामाचा इन्साफ काढून मुन्सफाकडे देण्यात आला. सदर अमीनास १०,००० व मुन्सफास ५००० रुपये पर्यंतचे दावे चालविणेचा अधिकार असे. शिरोळ कोर्टाचे ताब्यात आळते व शिरोळ हे दोन पेटे, कडगांव कोर्टाचे ताब्यात भुदरगड व गडहिंग्लज हे दोन पेटे आणि करवीर सदर अमीन कोर्टाचे ताब्यात करवीर, पन्हाळा हे दोन पेटे होते. त्यांचे निकालावर अपील पोलिटिकल सुपरिंटेंडेंटकडे होत असे व त्यांच्या निकालावर दुसरे अपील मुंबई सरकारकडे चाले.

फौजदारी कामात सहा पेटचांचे सहा मामलेदार व बावडा, विशाळगड आणि कागल या संस्थानचे कारभारी यांजकडे ५० रु. दंड आणि तीन महिनेपर्यंत शिक्षा देण्याचा अधिकार दिला. कोल्हापुरास न्यायाधीश कोर्ट असे. त्यास २०० रु. दंड व ३ वर्षेपर्यंत शिक्षा सांगण्याचा अधिकार असे. शहर कोतवालास चिल्लर गुन्हयांची चौकशी करून २५ रु. दंड व एक महिना शिक्षा सांगण्याचा अधिकार असे. फौजदारी कामात वरिष्ठ कोर्ट पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांचे होते. या कोर्टात खालील कोर्टाच्या निकालावरील अपिले व मोठ्या गुन्हयांची असेसरांचे मदतीनें चौकशी होत असे. पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यास ब्रिटिश इलाख्यातील सेशन्स जज्जाचे अधिकार असत.

नमूद करण्यासारखी गमतीची गोष्ट अशी की या काळात कोर्टाची स्थापना झाली परंतु कोणत्याच बाबतीत ठराविक कायदे नव्हते. (Procedural or substantive laws) असे दिसते. मुंबई इलाख्यात चालू असलेल्या कायद्याचे धोरणाने तसेच व्यवहार व रुढी यास अनुसरून कामाचा निकाल केला जात असे. मात्र ज्या ठिकाणी इकडील देशचालीस ते कायदे विरुद्ध असत त्या ठिकाणी इकडच्या चालीप्रमाणे काम चाले. उदा. हुकूमनामानिवाडा अंमलात आणताना ऋणकोचे नांदते घर विक्री केले जात नसे. मात्र ते तारण दिले असेल तर विक्री करता येत असे. कोणत्याही कारणाने ऋणकोची जमीन ही विकली जात नसे. त्याचप्रमाणे ऋणकोस दिवाणी तुरुंगात घालण्याचीहि वहिवाट नसे. जहागीरदारांचे काही प्रमाणात अधिकार कमी केले. जहागीरदारास मृत्यूची अगर दहा वर्षांहून जास्त कैदेची शिक्षा सांगणेचा अधिकार नसे आणि मोठें गुन्हे पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांचेकडे चौकशीस पाठवावे लागत. बाकी सर्व अधिकार त्यांचेकडे चालत होते. त्याचप्रमाणे मोठे भयंकर राजद्रोहात्मक अगर तत्सम गुन्हयाबद्दल त्यांना पोलिटिकल सुपरिंटेंडेंटकडे वर्दी द्यावी लागे. इ. सन १८४८ चे घडामोडीमुळे त्यांच्या अधिकारातही कपात करण्यात आली.

## वटहुकूमाची सुरवात

पुढे राज्यकारभार करताना वेळोवेळी प्रत्यक्ष अडीअडचणी जसजशा येऊ लागल्या त्या त्या प्रमाणात त्यांचे निवारण करण्याकरिता पोलिटिकल एजंट, स्टेट कारभारी इत्यादि वरिष्ठ अधिकारी वेळोवेळी सर्क्युलर, जाहीरनामे, वटहुकूम इत्यादि नावाने हुकूम काढू लागले व त्याना कायद्याचा दर्जा प्राप्त झाला. पुढे पुढे ही प्रथा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, दप्तरदार, सरसुभे, दिवाण इत्यादि अधिकाऱ्यांनी चालू ठेविली व त्या सर्वांस प्रस्थापित ( established ) कायद्याचा दर्जा प्राप्त झाला. यातील काही वटहुकूम (procedural) तांत्रिक, काही (administrative) कारभारविषयक, काही (substantive) कायदा स्वरुपाचे आहेत. वटहुकूमाची ही प्रथा अलिकडील काळापर्यंत म्हणजे संस्थान असेपर्यंत चालू होती. वटहुकूमानें निर्माण झालेला कायदा हा कोल्हापूरच्या न्यायपद्धतीच्या इतिहासातील एक उल्लेखनीय वैशिष्टच म्हणून सांगता येईल. कायद्यापेक्षा हे वटहुकूम वयाने वडील असल्याने न्यायाच्या क्षेत्रात त्याची दादागिरी अनिर्बंध चालत असे.

कोल्हापूर इलाख्यातील जहागीरदार, इनामदार, सरंजामदार, दुमालदार यांनादेखील कमीजास्त प्रमाणात दिवाणी फौजदारी अधिकार त्यांच्या ताब्यातील मुलुखापुरते असत. हे अधिकार दरबारातील त्यांचे महत्त्व व स्थानानुसार कमीजास्त असत. पण ता. २०।१०।१८६२ च्या तहनाम्याने छत्रपतींचे जहागीरदारांवरील ( direct control ) प्रत्यक्ष प्रभुत्त्व कमी होऊन पोलिटिकल एजंटच्या दिमतीने जहागीरदारांवर ताबा चालविण्याचे ठरले. तत्वतः जहागीरदार हे

छत्रपतींचे मांडलीक असले तरी १८६२ च्या तहाने पोलिटिकल एजंट हा जणु काय जहागीरदारांचा पालक बनला व या तहनाम्याने जहागीरदार यांचे अस्तित्त्व व हक्काना अबाधित राखण्याची हमी देण्यात आली. खुद्द जहागीरदार यांचेवरील दावे वगैरे चालविण्यासाठी दरबार व पोलिटिकल एजंट यांचे एक जॉईंट कोर्ट होते.

3

सन १८६७ च्या सुमारास राज्यव्यवस्था ब्रिटिश सरकारकडे आल्यानंतर पुन्हा स्थित्यंतराचा कारभार आला. यावेळी मुंबई इलाख्यात बरेचसे कायदे जारी झाले होते. कायद्याचे राज्य प्रस्थापित होऊन प्रजेमध्ये शांतता प्रस्थापित झाली होती. हिंदुस्थान सरकारचेही अनेक कायदे अंमलात आणले होते. तेंव्हा या दृष्टीनें कोल्हापूर इलाख्यातसुद्धा कायद्याचे राज्य आणून शांतता प्रस्थापित करून प्रजेमध्ये स्वास्थ्य, अभय व शांतता निर्माण करावी या दृष्टीनें पाऊले पडू लागली. पण त्यापूर्वी न्यायव्यवस्थेत नवीन फेरफार काय झाले ते पाहू.

## न्यायाधीश कोर्ट स्थापना

१८६७ साली न्यायाधिशास खाली लिहिलेले आणखी नवीन अधिकार देण्यात आले. पांचशेहे रुपयांपर्यंत अव्वल दाव्यात कनिष्ठ कोर्टाचे ठरावावर फक्त एकच अपील न्यायाधीशाकडे व्हावे असे ठरविले. इतर दाव्यात कनिष्ठ कोर्टावरील अपीले आणि १०,००० रुपयांहून जास्त रकमांचे अव्वल दावे चालविण्याचा अधिकार न्यायाधिशास दिला. म्हणजे न्यायाधीश कोर्ट हे principal court of original jurisdiction असे झाले. न्यायाधिशावर अपील पोलिटिकल एजंटाकडे व्हावे असे ठरविले. फौजदारी कामात न्यायाधिशास डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटचा अधिकार दिला. तसेच त्यास असिस्टंट सेशन जज्जाचाहि अधिकार देण्यात आला. या अधिकाराने पोलिटिकल एजंट जे फौजदारी खटले चौकशीस पाठवीत त्याची चौकशी न्यायाधीश करीत. असिस्टंट पोलिटिकल एजंट यासही फौजदारी कामात असि. सेशन जज्जाचे अधिकार देण्यात आले आणि दिवाणी कामात पोलिटिकल एजंट जी अपीले पाठवितील त्यांची चौकशी करण्याचे अधिकार दिले.

शिवाय विशेष हे की १८६६ अखेरपर्यंतचे न्यायाधीश कोर्टाचे ठराव हे राजा ऑफ कोल्हापूर यांच्या सहीनिशी होत. त्या ऐवजी आता स्वतंत्र नेमलेल्या व्यक्तीकडून स्वतंत्रपणे होऊ लागले. या सर्व दृष्टीने जिल्हा न्यायालयाची District Court ची स्थापना ही खऱ्या अर्थाने १८६७ साली झाली असे मानावे लागेल.

१८६७ सालच्या न्यायालयाच्या प्रस्थापनेचा हा मूहर्त अमृतसिद्धीदायक ठरला. कारण, असे संपूर्ण अधिकाराचे ( full fledged ) जिल्हा न्याय कोर्ट होताच पुढे प्रख्यातीस आलेले अखिल भारतीय कीर्तीचे थोर समाजसेवक नामवंत न्यायाधीश न्या. **महादेव गोविंद रानडे** यांची नियुक्ति होऊन त्यांनी १८६७-६८ च्या काळात सुमारे एक वर्षभर हे पद भूषविले व ह्या न्यायालयाची एक थोर व उज्वल परंपरा निर्माण केली. कोल्हापूर जिल्हा न्यायालयाचे न्या. महादेव गोविंद रानडे हे पहिले न्यायाधीश होऊन गेले. ही एकच गोष्ट अभिमानाने आमची अंतःकरणे प्रफुल्लीत करण्यास पुरेशी आहे व या गोष्टीमुळेच ह्या शतसांवत्सरिक महोत्सवाला एक प्रकारचे आगळे महत्व प्राप्त झाले आहे. करवीरच्या जिल्हा न्यायालयाची मान अभिमानाने ताठ होण्यासारखी ही घटना म्हणावी लागेल.

## कायद्याचे राज्य

१८७२ साली नवा फौजदारी काम चालविण्याचा कायदा (१८७२ चा १० वा) चालू केला. या कायद्याने मामलेदारास सेकंड क्लास मॅजिस्ट्रेटचा अधिकार मिळाला व त्यास सहा महिनेपर्यंत कैदेची शिक्षा आणि २०० रु. पर्यंत दंड इतकी शिक्षा देता येऊ लागली.

१८७४ सालचे आरंभास डिस्ट्रिक्ट ऑफिसर या नांवाचे दोन नवीन ऑफिसर नेमण्यात आले व त्यास फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटचे अधिकार देण्यात आले. कोल्हापूर प्रांताचे उत्तर व दक्षिण असे दोन विभाग करून या दोघांचे ताब्यात दिले (उत्तरभाग डि. ऑ. चे ताब्यात करवीर, पन्हाळा, शिरोळ, आळते व द. भाग डि. ऑ. चे ताब्यात गडहिंग्लज, भुदरगड). त्यांचा पगार महिना २५० रुपये होता. शिवाय कटकोळ व रायबाग महाल ठाण्यावर एक एक महालकरी ठाणेदार असत. त्यांचा पगार ४०/४५ रुपये असे.

१८७४ ला रजिस्ट्रेशन रुल्स अंमलात आले. १८७७ चे सुमारास मुंबई सरकारचे व हिंदुस्थान सरकारचे काही रेग्युलेशन्स व कायदे अंमलात आले. १८७९ ला सि. प्रो. कोड (१८५९ चा ८ वा) लागू केले. १८८२ ला स्टांप रुली अंमलात आली.

१८८८ पासून कोल्हापूर दरबारचे स्वतंत्र गॅझेट नियमाने प्रसिद्ध होऊ लागले ही एक महत्वाची घटना होय. या कारणाने पहिल्या गॅझेटमध्यें त्यावेळेपर्यंत अंमलात असलेले व त्यावेळीहि लागू केलेले असे सुमारे पन्नास कायदे लागू असल्याचा उल्लेख मिळतो. (ही यादी मुलकी वटहुकूम पा. ५९ वरहि आहे.)

१८९३ ला कोल्हापूर सरकारने आपले स्वतःचे म्हणून कायदे करून ते छापून पुस्तक रूपाने प्रसिद्ध केले. अर्थात्

बाहेरील कोठल्यातरी कायद्यावर ते आधारित होते. या पुस्तकाचे नांव Kolhapur State Rules असे आहे. कारण कायद्याऐवजी रुल्स (उदा. Evidence Rules) असे संबोधण्यात येई.

## उज्जीवन काळ (Renaissance)

इ. स. १८९४ साली छत्रपति **शाहू महाराजांना** राज्य कारभाराची सूत्रे दिल्यानंतर १८३७ ते १८९४ पर्यंतचा अज्ञान कारकीर्दीचा प्रदीर्घ कालखंड (फक्त १८६२ ते १८६५ च्या काळाखेरीज करून) समाप्त झाला. या दीर्घ काळात ब्रिटिश सरकारच्या देखरेखीखाली व्यवहारप्रधान (common sense justice) न्यायपद्धतीपासून कायदाप्रधान (Legal justice) न्यायपद्धतीपर्यंतची मजल यथावकाश गाठली गेली. सुप्रतिष्ठित कायद्याप्रमाणे न्याय करणारी न्यायालये कार्यान्वित झाली. लोकामध्ये एकप्रकारची निर्धास्त भावना (Sense of security) वाढू लागली. न्यायाची चाड व अन्यायाची चीड या तत्त्वाचा न्यायालयाकडून उद्घोष होऊ लागला. कोणाच्याही हक्कांचे अगर संपत्तीचे अपहरण होणार नाही ही हमी या Judiciary ने मिळवून दिली.

१८९४ साली छत्रपतींच्या हाती राज्यकारभार दिला त्यावेळी जहागिरी सोडून कोल्हापूर (Proper) पुरते दिवाणी फौजदारीबाबतीत पूर्ण व अखेरपर्यंतचे अधिकार देण्यात आले होते. जहागीर हद्दीतील दिवाणी फौजदारी बाबतीत अखेरचे अधिकार ब्रिटिश सरकारने आपणाकडे राखून ठेवले होते. पुढे १८९८ साली जहागीर कोर्टावरील वरिष्ठ प्रकारचे दिवाणी अधिकार व १९०२ साली या कोर्टावरील वरिष्ठ (Higher) प्रकारचे फौजदारी अधिकार (To entertain Appeals, Special Appeals, Revision) म्हणजे हायकोर्टचे अधिकार छत्रपति महाराजांकडे सुपूर्त करण्यात आले.

शाहू छत्रपतींनी राज्यसूत्रे हाती घेतल्यावर थोड्याच काळात म्हणजे १९०० साली गोवधबंदीचा कायदा करून शिवछत्रपतींची 'गो(ब्राम्हण)प्रतिपालक' ही बिरुदावली सार्थ केली.

अनेक दृष्टीने या कालखंडाला उज्जीवन (Renaissance) काळ म्हणता येईल. छत्रपति शाहू महाराजांचेबद्दल आवर्जून म्हटले जाते की त्यानी सनातनी म्हणून सुरवात केली आणि सुधारक म्हणून आपली कारकीर्द संपविली. (He begins as a Conservative and ends as bold Reformer). महाराजांचे विचारात दूरदृष्टी होती. काळाची पावले ओळखण्याची पात्रता होती. बहुजन समाजाला सुशिक्षित करावे, सामाजिक विषमता नष्ट करावी, अस्पृष्यता निवारण, जातीभेद निर्मूलन इत्यादीवर नवविचारांचे मंथन छत्रपतींच्या मनात चालले होते.

कायद्याचे दृष्टीने विचार करता खालील विशेष कायद्यांचा उल्लेख केला पाहिजे. १९०९ मध्ये क्रिमिनल प्रोसीजर कोड तर १९१२ मध्ये सध्याचे सिव्हिल प्रोसीजर कोड अंमलात आले. ट्रॅन्स्फर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, लिमिटेशन ॲक्ट, निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट असे कांही महत्त्वाचे कायदे प्रथमतःच १९२२ साली लागू झाले. तोपर्यंत मुदतीबाबत १८२७ च्या मुंबईच्या आठव्या रेग्युलेशन प्रमाणेच प्रपंच चालला होता. म्हणून जेव्हा नवीन कायद्याप्रमाणे तीन वर्षाची मुदत (grace period) संपली तेव्हा म्हणजे १९२५ सालीं कोल्हापूर कोर्टात दाव्यांचा अक्षरशः पूर लोटला. त्याची तुलना पुढे बी. ए. डी. आर. ॲक्टप्रमाणे झालेल्या असंख्य अर्जांशीच करावी लागेल.

१९२० साली **'हिंदू कायद्याचे निबंध'** जे प्रसिद्ध झाले त्याचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. कारण स्मृति वचनावर व त्याचे अर्थ लावणाऱ्या न्यायनिवाड्यावर जो हिंदू कायदा अवलंबून होता तो यावेळी नियमबद्ध (codify) करण्यात आला. या कारणाने १९२० नंतर या देशात इतरत्र

### रुचिपालट

#### कोर्टांचा पूर

एका तालुक्यात दोन कोर्टस् चालू ठेवावीत का एकच ठेवावे असा प्रश्न न्या. **छगला** यांच्या कोल्हापूर भेटीच्यावेळी निर्माण झाला होता. तेव्हा ते म्हणाले की अधिक कोर्टस् ठेवून जनतेस न्याय सुकर करण्याचे धोरण आपल्यास पसंत आहे.

न्यायमूर्तींचे हे धोरण कोल्हापूरने काही काळ विशेषत्वाने अंमलात आणल्याचे दिसते. एकट्या कोल्हापूर शहरात किती कोर्टस् एकावेळी होती ते पहा. सुप्रीम कोर्टापासून सबजज्ज कोर्टापर्यंत व सेशन्स कोर्टापासून तालुका मामलेदारपर्यंत सर्व प्रकारची अशी खास कोल्हापुरची १६ कोर्टस्. काही जहागिरदार यांच्या ऑफिसचे ठिकाण कोल्हापूरातच म्हणून त्यांची अव्वल अपील अशी ६ कोर्टस् होती. दुमालदारानाहि अधिकार दिले गेल्याने त्यानीहि आपली ४ कोर्टस् कोल्हारापुरातच थाटली. अशातच नागरिकाना न्यायदानाचे शिक्षण देण्याचे धोरणाने ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमून त्याना वर्ग ३ चे खटले चालविण्याचे अधिकार दिल्याने आणखी तब्बल १२ कोर्टांची भर पडली. सरासरी २००० लोकसंख्येस एक कोर्ट असा जो कोल्हापूरने उच्चांक गाठला त्याची बरोबरी इतर शहरात क्वचितच झाली असेल.

न्यायमूर्तींना अभिप्रेत असलेलें धोरण हेच की कसे व या योगे न्याय सुकर झाला की कसे हे सांगणे कठिण आहे. पण वकिलाना ही परिस्थिती फायदेशीर ठरली हे निर्विवाद होय.

क्रांतिकारक बदलाचे व एकमेकास छेदक (revolutionery and conflicting) असे जे हिंदू लॉच्या काही बाबीसंबंधी न्यायनिवाडे झाले त्यापासून कोल्हापूरचा हिंदू कायदा अलिप्त राहिला. त्याबरोबरच हेहि कबूल केले पाहिजे की इतरत्र जे हिंदू स्त्रीच्या हक्काबाबत पुरोगामी स्वरुपाचे कायदे अंमलात आले त्यापासूनही आम्ही वंचित राहिलो. नाही म्हणावयास काडीमोडण्याचा कायदा (Divorce Rules) हा १९१९ साली सर्व हिंदू प्रजाजनाकरिता जारी करून एका बाबतीत आमच्या सरकारने आघाडीवर पाऊल टाकले होते हे नमूद केले पाहिजे.

शाहू महाराजांच्या कारकीर्दीत न्यायालयाची व्याप्ति मर्यादित करणारी अगर त्यांच्या अधिकारावर आक्रमण करणारी अशी काही कोर्टे अगर ट्रिब्युनल अस्तित्वात आली त्याचाहि उल्लेख करणे जरूर आहे. त्यापैकी पहिले म्हणजे रिक्रूट अगर **आर्बिट्रेशन कोर्ट.** पहिल्या महायुद्धात लढाईवर जाण्यास तयार असा जो कोणी एक रिक्रूट देईल त्यास आपले देण्या-घेण्याबद्दलचे गाऱ्हाणे अगर कपट, लबाडी, दांडगाईने गेलेली मिळकतीसंबंधी तक्रार करण्यास त्या कोर्टात मुभा होती. अशा तक्रार अर्जांचा विचार करण्याकरता एक स्पेशल ट्रायब्युनल नेमले होते. त्या कोर्टास पुराव्याचा कायदा, मुदतीचा कायदा, प्रोसीजर वगैरेचे बंधन नव्हते. अशा कामी अर्जदारला 'न्याय' देण्याच्या भरात विरुद्ध पक्षकारवर 'अन्याय' होणें हे अपरिहार्यच होय.

दुसरा मामला **इन्क्वायरी बेंच** कोर्टाचा. प्रत्येक गावात मुलकी दप्तर हाताळणारे जे कुलकर्णी होते त्यानी आपल्या अकलेचा व अधिकाराचा गैरवापर करून म्हणजे 'लबाडी' करून इतर लोकांच्या जमिनी आपले अगर इतर लोकांच्या, खात्यात चढविल्या असतील तर त्याबाबत तक्रार करून दाद मिळण्यासाठी हे बेंच व त्यासंबंधीचा वटहुकूम सन १९१८ साली अंमलात आला. याची चौकशीसुद्धा संक्षिप्त व वर नमूद केल्याप्रमाणें इतर कायद्याच्या बंधनातून मुक्त अशी होती. कुलकर्णी लोकानी लबाडी बहुधा केलीच असावी असे गृहीत धरूनच जणु काही हा कायदा झाल्याने त्याच्या अंमलबजावणीत काही अन्याय व्हावेत हेहि क्रमप्राप्तच होय.

इनाम मिळकतीसंबंधीचे सर्व प्रकारचे दावे हे दिवाणीत न चालता मुलकीत चालावेत असा वटहुकूम बरेच वर्षापासून जारी होता या कारणानेहि दिवाणी कोर्टाची अधिकारव्याप्ति मर्यादित होती.

## प्रागतिक काळ

अशा स्थितीत छत्रपति शाहू महाराज मे १९२२ ला मृत्यू पावले व छत्रपति **राजाराम महाराज** गादीवर आले. त्यांचे कारकीर्दीत ज्या तऱ्हेचे कायदे झाले व न्यायविषयक घटना घडल्या त्यावरून महाराजांचे धोरण हे प्रागतिक होते, सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे दृष्टीने त्यांची पाऊले पडत होती, व न्याय आणि न्यायालयाची कदर वाढविण्याची त्यांची मनीषा होती असेच म्हणावे लागेल.

ते गादीवर येताच रेव्हेन्यू इन्क्वायरी बेंच त्यांनी रद्द केले. रिक्रूट बोर्डाची कामे संपुष्टात आलीच होती. १९२५ साली बॉंबे रेव्हेन्यू ज्युरिस्डिक्शन ॲक्ट लागू केल्याने इनामी संबंधीचे दावे रीतसर दिवाणी कोर्टात चालू लागले. अंडरसन पद्धतीप्रमाणें सर्व संस्थानात रेकॉर्ड ऑफ राइटस् अंमलात आणण्याचे दृष्टीने मोजणी व चौकशीस १९२७ सालापासून प्रारंभ झाला. शहरात पुढे सिटी सर्व्हे इन्क्वायरी सुरू झाली.

या कारकीर्दीतील न्यायदानाचे दृष्टीने अत्यंत मोठी घटना म्हणजे १९३१ साली स्वतंत्र **हायकोर्ट** स्थापन करण्यात आले ही होय. पण याचे महत्व कळण्यासाठी यावेळपर्यंत काय स्थिति होती ते पाहिले पाहिजे. हायकोर्टचे अधिकार छत्रपति हे वापरीत. अर्थात् अशा कामाच्या सुनावणीसाठी व अभिप्राय देण्यासाठी दोन तज्ञ कोर्टाचे बेंच नेमलेले असे. त्यांचा अभिप्राय अखेर 'हुजूरून' मंजूर झाल्यावर त्याला डिक्रीचे स्वरूप येई. या पद्धतीत एक असा मोठा दोष असा असे की, अभिप्राय ज्याच्या विरुद्ध जाई तो हुजूरकडे तक्रार अर्ज देऊन विनवणी करी की, आपले काम दुसऱ्या बेंचपुढे अगर व्यक्तीकडे घालून आपल्या कामाचा फेर विचार व्हावा म्हणून. अशी विनंति क्वचित् मंजूर होई व काम दुसऱ्याकडे फेर विचारार्थ जाई. या योगे एक तर कामाचा निकाल लवकर होत नसे आणि कधी कधी मूळ अभिप्राय देणाऱ्यांचेपेक्षा कमी लायखीचे व्यक्तीकडून मूळचा अभिप्राय फिरविला जाई व दुर्दैवाने अखेर तोच मंजूर व्हावयाचाहि.

ही स्थिति सुधारण्यासाठी व विशेषतः न्यायदानात स्थैर्य व न्यायाबद्दल विश्वास उत्पन्न होण्याचे दृष्टीने ता. ३१-५-१९३१ रोजी कोल्हापूर दरबारने कायदा करून स्वतंत्र हायकोर्टाची व सुप्रीम कोर्टाची स्थापना केली व न्यायालयातील एक क्रांतिकारक टप्पा गाठला. हायकोर्टाकरिता तीन न्यायाधिशांची नेमणूक झाली. एक कोर्ट ओरिजिनल साईडचे कामाकरिता व दुसरे दोघांचे बेंच अपील व तपासणी अशा कामाकरिता. सुप्रीम कोर्टाकरिता सहा कोर्टाचे एक पॅनेल नेमले गेले. कमीत कमी दोन पासून चार लोकांचे बेंचापुढे काम चालत असे. त्यांनी आपला अभिप्राय (advice) हुजूरकडे सादर करावयाचा व तो हुजूरून मंजूर झाल्यावर डिक्री व्हावयाची अशी तरतूद इंग्लंडमधील प्रीव्ही कौन्सिलच्या धर्तीवरच केली गेली होती. समाधानाची गोष्ट मात्र ही की, कांही थोडे अपवाद वगळल्यास, असा सल्ला (advice) हा सहसा मानला जात असे. म्हणजे हायकोर्ट स्थापनेपूर्वी हुजूर बेंच कोर्टानी दिलेल्या अभिप्रायाप्रमाणे सुप्रीम कोर्टाच्या अभिप्रायास फाटे फुटत नव्हते. स्वतंत्र अधिकाराचे हायकोर्ट

स्थापन झाल्याने साहजिकच सर्व कनिष्ठ कोर्टाचे कामकाजावर योग्य नियंत्रण आले. न्यायाबद्दल वचक वाटू लागला व विश्वास वाढला. थोडक्यात लिहायचे म्हणजे न्यायदानाची बूज राखली जाऊ लागली व प्रतिष्ठा वाढली ही न्यायदानाचे दृष्टीने अभिमानास्पद घटना होय.

दरबारने जे गेल्या ७५-८० वर्षांच्या काळात तरतऱ्हेचे वटहुकूम जारी केले होते ते एकत्र कोठेहि पहायला मिळत नसत. त्यापूर्वी फक्त सन १९१७ साली मराठे मामलेदार यांचे वटहुकूम एकत्र करून छापलेले एक पुस्तक प्रसिद्ध होते पण तेहि संपूर्ण असे नव्हते व त्या नंतरच्या कालात कित्येक वटहुकूम रद्द झाले तर कित्येक नवीन जारी झाले. हे सर्व सुसूत्र तऱ्हेने एकत्र पुस्तक रूपात छापण्याची महनीय कामगिरी सन १९३६ साली झाली.

## पुनः अज्ञान कारकीर्द

दि. २६ नोव्हेंबर १९४० रोजी श्री राजाराम छत्रपति हे एकाएकी अकाली निवर्तले आणि १८९४ ला सुरू झालेली 'सज्ञान' कारकीर्द ४६ वर्षांनी पुनः संपुष्टात आली. मध्यंतरी एक दत्तक प्रकरण झाले. पण तो दत्तक अल्पवयी आणि अल्पजीवीहि ठरला. अखेरीस सन १९४७ साली सध्याचे विद्यमान छत्रपति **शहाजी राजे** हे गादीवर आले पण पाठोपाठच आलेल्या विलिनीकरणाच्या मोहिमेत तीहि कारकीर्द अल्पायुषीच ठरली. दरम्यानच्या अज्ञान कारकीर्दीत साहजिकच पोलिटिकल रेसिडेंटमार्फत ब्रिटिश अमदानीतील हिंदुस्थान सरकारचे राज्यकारभारावर तरतऱ्हेचे नियंत्रण आले आणि ही अज्ञान कारकीर्दसुद्धा पूर्वीच्या अज्ञान कारकीर्दीप्रमाणेंच कारभारविषयक दृष्टीने हितावह ठरली हे नमूद केले पाहिजे.

कनिष्ठ जागेवर न्यायाधीश नेमणुकीपूर्वी अर्ज मागवून छाननी करून योग्य निवड करण्याची कोशीस सुरू झाली. वरिष्ठ जागेकरिता लायख व्यक्ती हेरून त्याना आग्रहपूर्वक पाचारण करण्यात आले. या संदर्भात न्या. सर गोविंद **माडगावकर**, न्या. एन्. एस्. **लोकूर**, न्या. एच्. व्ही. **दिवेटिया** प्रभृति विद्वान व अधिकारी व्यक्तींची नेमणूक याचा निर्देश करावा लागेल. यापैकी न्या. माडगावकर यांनी सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश या नात्याने जी कामगिरी केली त्याचा विशेषत्वाने उल्लेख केला पाहिजे. त्यांचे न्यायदान किती सखोल, विद्वत्तापूर्ण आणि मार्गदर्शक होते याची प्रचीति त्यांच्या निवाडयाचे जे चार भाग 'कोल्हापूर लॉ रिपोर्टस्' या नावाने प्रसिद्ध झाले त्यावरून होतेच. वरिष्ठ कोर्ट म्हणून त्यांनी सर्व न्यायखात्याची कसून तपासणी केली व त्यात त्यांना जे जे आक्षेपार्ह आढळले त्याविरुद्ध त्यांनी कडक शेरे मारले. ती टीका काहींचे बाबतीत अती कठोर अशी झाली तरी एकंदरीत न्यायखात्याचा सर्वसाधारण नूर ( tone ) पालटायला त्यांच्या रिपोर्टाची मदत झाली हेहि सत्य आहे.

१-३-४६ पासून ३०-६-४७ पर्यंत कोल्हापूर हायकोर्ट हे जवळ आसपासची काही संस्थाने व कोल्हापूर यांचे **जॉईंट हायकोर्ट** म्हणून झाले होते.

वर निर्दिष्ट केल्यासारखे विद्वान न्यायमूर्ती येथे लाभल्याने साहजिकच त्यांच्यापुढे कामे चालवायला श्री. गजेंद्रगडकर, बॅ. तेंडुलकर, जहागिरदार ( हे तिघे पुढे न्यायाधीश झाले.), ए. जी. देसाई, बेळवी, सोमण प्रभृति नामवंत वकील आले. त्या कारणाने त्या धंद्यातील कांही आदर्श स्थानिक वकिलांना अनायासे पहायला मिळाले.

१९४२ साली कोल्हापूर लेजिस्लेटिव्ह असेंब्लीसंबंधी कायदा होऊन १९४४ मध्ये त्यावर लोक प्रतिनिधि निवडून गेले व येथे मूळ अंमलात असलेल्या कायद्याऐवजी फेरफारासह कोल्हापूरचे म्हणून स्वतंत्र कायदे मंजूर करण्यात आले. १९४४ ला सरकारवर दावा करण्याची मुभा मिळाली ही सुद्धा एक महत्वाची बाब होय.

## विलिनीकरणानंतर

अशा स्थितीत ता. १ मार्च १९४९ रोजी कोल्हापूर हे मुंबई राज्यात विलीन झाले. या योगे कोल्हापूर हा त्या राज्यातील फक्त एक जिल्हा झाला आणि साहजिकच कोल्हापूरच्या विशिष्ट अशा वरिष्ठ कोर्टसूचे अस्तित्व संपले आणि जिल्हा न्यायालय हेच आता येथील उच्च न्यायालय ठरले.

या स्थित्यंतराने काही कमी घडामोडी झाल्या नाहीत. खूप नवीन कायदे अंमलात आले. त्यात बी. ए. डी. आर. व टेनन्सी ॲक्टसारखे क्रांतिकारक कायदे होते. मुळात लागू असलेले सर्व कायदे रद्द झाले. तथापि हिंदु कायद्याचे निबंध आणि सर्वांना बुचकळ्यात टाकणारे वटहुकूम यांचे अस्तित्व कायमच राहिले. मूळच्या संस्थानचे कांही भाग दुसऱ्या जिल्ह्यात गेले तर काही भाग नवीन सामील झाले. वकिलांच्या सनदांचा प्रश्न निर्माण झाला. वरिष्ठ कोर्टस् येथून गेल्याने होणारी अडचण तर विशेषच होती. आणि या सर्वांहूनहि आमचे संस्थान नष्ट झाल्याने आमचे स्वातंत्र्य, आत्मीयता, अस्मिता इत्यादीवर जो आघात झाला तो तर न भरून येण्यासारखाच असा होता. अर्थात फायदेही कांही झाले. पण विलिनीकरणापासून झालेले फायदे-तोटे हा एक स्वतंत्र लेखाचाच विषय होईल. ज्या दृष्टीने हा ऐतिहासिक आढावा घेतला जात आहे त्यापुरता विचार करता हा विषय येथे संपविणे इष्ट वाटते.

# कोल्हापुरातील वकिली व वकील

लेखक : गणेश रंगो हळदीकर

* लेखक परिचय : बी. ए., एल्एल्. बी. वकील. करवीर राज्य संस्थापक 'ताराराणी' या विषयावर स्फुट लेख व व्याख्याने. 'स्मृतिकालिन न्यायपद्धति' व इतर स्फुटविषयावर लेखन. 'बुद्धिबळ क्रीडारत्ने' या संशोधनात्मक पुस्तकाचे संपादक व संस्कृतचे व्यासंगी.

आमच्याच धंद्याविषयी आणि आमच्याच वकील वर्गाविषयी हा लेख आम्ही लिहीत आहोत हे खरे; पण असे करताना आमच्यावर अनेक मर्यादा पडत आहेत. एक तर गेल्या शतकातील नामांकित वकिलांचेबद्दल माहिती फारच थोडी मिळाली आणि जी मिळाली ती अगदी ऐकीव स्वरुपाची व अत्यंत त्रोटक. साहजिकच अनेक दिवंगत पण नामवंत अशा व्यक्तींचा नामनिर्देश यात होत नाही व जो होत आहे तो सदोष असणार याची आम्हाला जाणीव आहे.

या शतकातील दिवंगत वकिलांच्याबद्दल त्या मानाने बरीच माहिती मिळाली. पण या बाबतीत अडचण वेगळीच आहे. एकतर केवळ माहिती मिळाली अगर आम्हास प्रत्यक्षहि आहे म्हणून सर्वांच्याबद्दल लिहिणे जसे युक्त ठरणार नाही तसेच ज्या शेलक्या व्यक्तीबद्दल आम्ही लिहित आहोत त्यांच्याबद्दल जेवढी माहिती मिळते ती सर्वच माहिती ग्रथित करणे हेहि युक्त ठरणार नाही. अशा शतसांवत्सरिक स्मरणिकेत काही थोड्याच व्यक्तींचा आणि तो सुद्धा अगदी थोडक्यात असाच उल्लेख असावा हे कोणासहि मान्य होईल. या व्यक्तींचा उल्लेख एक रीतीने प्रातिनिधिक स्वरुपाचा होय. या कारणाने निर्देशिलेल्या व्यक्तिखेरीज आणि दुसरे कोणी नामांकित किंवा उल्लेखनीय नव्हते असा गैरसमज न व्हावा.

आमची वकिलांची सध्या जी हयात पिढी आहे त्यांच्याबाबत तर आणखी एक मोठी अडचण निर्माण होत आहे. एकतर आज जे आघाडीवर आहेत त्यापैकी अनेक या महोत्सव समितीशी वेगवेगळ्या रीतीने निगडीत असल्याने आमचा आम्हीच उल्लेख करणे ही निःसंशय संकोचाची गोष्ट होय. दुसरे असे की तरुण वकील पिढीमध्यें ज्यांची कर्तबगारीची चमक आज दिसते आहे म्हणजे जे भावि कालाचे आशास्थान आहेत त्यांचा तरी उल्लेख कसा टाळायचा? या सर्व कारणाने आम्ही असे बंधन घालून घेतले आहे की कोणाहि हयात वकिलांचे स्वतंत्र छायाचित्र छापायचे नाही किंवा त्यांच्या वकिलीतील नैपुण्याबद्दल उल्लेख करायचा नाही. माहिती येईल ती त्यानी वकिलीच्या धंद्याबाहेर जाऊनहि जी विविध क्षेत्रात विशेष कामगिरी केली त्यासंबंधीच फक्त. आणि ती सुद्धा काही थोड्यांचीच प्रातिनिधिक स्वरुपात निर्देश होईल. त्यापेक्षा कितीतरी अधिक वकील बंधूनी विविध क्षेत्रात लहान मोठी कामगिरी केली आहे याची आम्हास जाणीव आहे.

हे समालोचन चार प्रकरणांत लिहिले जात आहे— १) वकिलीच्या धंद्यासंबंधी. २) गेल्या शतकातील वकील व राष्ट्रीय चळवळीचे बीजारोपण. ३) या शतकातील दिवंगत वकील व ४) विद्यमान वकिलांची चाकोरी बाहेरील कामगिरी.


## १

### वकिलीचा उगम

ज्या शंभर वर्षाचा हा इतिहास आहे त्या काळात म्हणजे १८६७ ला डिस्ट्रिक्ट कोर्ट स्थापन झाले तेव्हापासून वकिलांचे अस्तित्व दिसून येत असले तरी त्यापूर्वीच्या काळात म्हणजे कोर्टाचे सुरवातीपासून (१८४४) तशीच परिस्थिती आहे असे नाही. पहिल्या कांही वर्षांचे निवाडे पाहता पक्षकार आणि न्यायाधीश यामध्यें कोणीहि 'मध्यस्थ' नव्हता हे स्पष्ट होते. पुढे १८४५ ला 'मुखत्यार बोलणार' या नावाने व पुढे सरळ तर्फे 'मुखत्यार' असा उल्लेख होऊ लागला. एवढेच नव्हे तर मुखत्यारांची ठराविक नावे वेगवेगळ्या पक्षकारातर्फे दिसू लागली व कामात मुखत्यारपत्र हजर केल्याचा उल्लेख येऊ लागला. म्हणजे एक तऱ्हेने १८४८ पासून वकील संस्थेचा उगम झाला असे म्हणावे लागेल. हा मुखत्यार शब्द जाऊन पुढे रीतसर 'वकील' हा शब्द १८६२ पासून आल्याचे आढळते. यथावकाश त्यांची नावेहि नमूद होऊ लागली.

# सर न्या. छगला यांची कोल्हापूर भेट.

१५-११-१९५०



उभी रांक ३ : परांडेकर, चिचवाडकर, तोडकर, पोतनीस, जाधव, हुजूरबाजार, टोपकर, किंकर, पंडीत, वाळवेकर, चव्हाण, साळोखे, कोडोलकर, कारंजकर, किंकर, बुरटे, पोतनीस, टोपकर, कोगनोळीकर, पाटील, मुरगुडकर, काळे, घाटगे.


उभी रांक २ : माने, हजारे, शिंदे, फडणीस, साखरे, लागू, राणे, शिरवळकर, नानिवडेकर, सोनटक्के, मोरे, देसाई, ढवळे, ढवळे, यादवाडे, गबाळे, हळदीकर, माजनाळकर, सडोलीकर, दंडगे, बेकनाळकर, पळसुले.

उभी रांक १ : घोलकर, पाटील, देवरूखकर, पाटील, परांजपे, चौगुले, पाटील, इंदुलकर, तेंडुलकर, मुधोळकर, मुतालिक, दिवाण, गोडे, पाटील, भागवत, पाटील, पिसे, जोशी, पाटील, सोनटक्के, खुपेरकर, माळी, तेरवाडकर, पाटील, रायबागकर, ठाकूर, गाताडे.

खुर्चीवर : सबनीस, पंडितराव, रानडे, फाटक, पोवार, सरलष्कर, अष्टेकर, तेंडुलकर, जोशी, सौ. नाईक, न्या. नाईक, सर न्या. छगला, सौ. छगला, पाटील, पुसाळकर, आपटे, अडके, नांद्रेकर, नानिवडेकर, पंडीत, राणे, धर्माधिकारी, राणे, वर्धमाने.

बसलेले : निपाणीकर, मुटकेकर, पोतनीस, दिवाण, करमरकर, जोशी, आगळगावकर, सरनाईक, वरेरकर, कुरुकलीकर, शेख.

# कोल्हापूर संस्थानचे न्यायाधीश



विलिनीकरणापूर्वी कोल्हापूर संस्थानच्या न्यायाधिशाना स्टाफतर्फे निरोप समारंभ झाला त्यावेळी म्हणजे दि. २७–२–१९४९ ला हा फोटो घेण्यात आलेला आहे. असोशिएशनचा निरोप समारंभ भावपूर्ण रीतीने त्या दिवशी रात्रौ करण्यात आला.

बसलेले : आर. जी. परांजपे ( रजिस्ट्रार ), वाय्. जी. सोवनी ( डि. जज् ), सी. एस्. देवधर ( स्पे. जज् ), आर. पी. सावंत ( हायकोर्ट जज् ), एन्. एस्. लोकूर ( चीफ ज
व्ही. जी. चव्हाण ( हायकोर्ट जज् ), ए. के. फडकर ( स्पे. जज् ), जी. डी. सोळांकुरकर, व्ही. व्ही. बोटगे.

उभे : ( बाबालाल जमादार ), सब् जजीस् व मॅजिस्ट्रेटस् बी. आर. माळी, डी. डी. सोनटक्के, डी. बी. महाडिक, बी. एस्. मुटकेकर, एम्. ए. चौगुले, एम्. एफ्. बी.

# कोल्हापुरचे वरिष्ठ न्यायाधीश व तेथील कर्मचारी

२२-२-१९४६



बसलेले :– जी. व्ही. जाधव (असि. जज्), व्ही. जी. चव्हाण (हायकोर्ट जज्), व्ही. एन्. देव (चीफ् जज्), एस्. बी. कालेलकर (हायकोर्ट जज्), वाय्. जी. सोवनी (डि. जज्), डी. एच्. पोवार ( रजिस्ट्रार ).

# पंचावन वर्षापूर्वीचा वकीलांचा एक मेळावा.



बसलेले : आवळीकर, करमरकर, धर्माधिकारी, दत्तोपंत जोशी, वर्णे, बुटाले, पाचलग, विद्याधर जोशी, श्रीखंडे, पंगू, आपटे, टोपकर, X खंडेराव बागल, गोविंदराव सोवनी,

खुर्ची : X नाईक, घाटगे, वि. वि. जोशी, रुकडीकर, परांडेकर, शेवडे, यड्रावकर, हुपरीकर, सावत, नाडकर्णी, सहस्त्रबुद्धे, सावत, आगाशे, देशमुख.

उभे रांक १ : गोखले, मसुरकर, श्रीधर जोशी, शिवराम सोवनी, वायंगणकर, X दादा फडके, शिरगावकर, बापट, ताम्हनकर, X टिपकुर्लीकर, X बंडूनाना
विठ्ठलराव रानडे, किणीकर, वाशीकर (का.), लेले, रिसबुड (का.).

पाठीमागील उभ्या रांकेत कारकून मंडळी व शिपाई आहेत. त्यांची नावे कळली नाहीत. वर दिलेल्या वकीलांची नावे निश्चित करण्यास फार प्रयास पडले. कदाचित् चूक झाली असण्याचा संभव आहे. जी नावे कळली नाहीत तेथे X अशी खूण केली आहे. का. म्हणजें कारकून.

वकिलीबाबतचा कायदा (मुंबई १८४६ चा पहिला) हा संस्थानला लागू असल्याबद्दल १८८८ चे गॅझेटमध्ये प्रथमतः उल्लेख मिळतो. त्यानंतर लीगल प्रॅक्टीशनर्स रूल्स म्हणून १८९३ ला संस्थानने प्रसिद्ध केले. बॉंबे प्लीडर्स ॲक्ट (१९२० चा) हा १९२८ ला अंमलात आला.

## कोल्हापूर स्टेट प्लीडर्स परीक्षा

खालसा मुलुखातून एलएल्.बी. ची परीक्षा किंवा डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा पास होऊन आलेल्या लोकांना संस्थानात वकिली करावयास परवानगी हक्कानेच मिळत होती. मुंबईसारख्या ठिकाणी जाऊन अशी परीक्षा पास होऊन येणे ही त्यावेळच्या परिस्थितीप्रमाणे सोपी गोष्ट नव्हती म्हणून मॅट्रिक परीक्षा पास झालेल्या लोकाना वकिलीची परीक्षा येथेच देता यावी याकरिता कोल्हापूर संस्थानने स्वतःची स्टेट प्लीडर्सची परीक्षा घेण्याची वेगळी तरतूद सन १८९१ साली केली. ही परीक्षा मराठी माध्यमातून देण्याची मुभा होती हे त्याचे एक वैशिष्ट्य होय. साधारणतः हायकोर्ट प्लीडर्सची परीक्षा बाहेर घेतली जात होती त्या धर्तीवर ही व्यवस्था होती. ही परीक्षा १९०१ अखेरपर्यंत घेतली गेली. यात पास झालेल्या लोकाना सर्व कोर्टात वकिली करण्यास हक्काने परवानगी मिळे.

## सनदी वकील

पण यायोगे काही मर्यादित व्यक्तींनाच कोर्टातून काम करण्यास मिळे हे उघड होय. कारण शिक्षणाचा प्रसार फारसा झालेला नव्हता. तेव्हा कमी शिक्षित पण हुषार अशा बहुजन-समाजातील व्यक्तीनाहि वकिली करण्यास संधी उपलब्ध व्हावी, त्यांच्यातील न्यूनगंड भावना कमी व्हावी या स्तुत्य धोरणाने श्री शाहू महाराज यानी Unqualified व्यक्तीना सनदा देण्याचे धोरण साधारणतः १९०८ पासून पत्करले व तेव्हा-पासून कोल्हापुरात 'सनदी' वकिलांचा एक मोठा वर्ग निर्माण झाला. अशा सनदा केवळ बहुजन समाजाला मिळाल्या असे नाही, त्या उच्चवर्गीयाना मिळाल्या तशाच काही अस्पृश्यानाहि मिळाल्या. याकरिता वार्षिक सनदेची फी ठेवण्यात आली. त्यामध्ये सर्व कोर्टात वकिलीची परवानगी (रु. २५), काही अगर एकाच कोर्टात परवानगी (रु. १२), फौजदारी कोर्टातून फक्त परवानगी (रु. १५) असे निरनिराळे वर्ग करण्यात आले. ही प्रथा विलिनीकरणापर्यंत अंमलात होती. वर्षावर्षाला सनद रिन्यू करणे आणि दरवेळी फी भरणे आणि तीसुद्धा केवळ कोल्हापूरची नव्हे तर जहागिरीतील कोर्टाकरता स्वतंत्ररितीने ही प्रथा योग्य नव्हती हे म्हटलेच पाहिजे. याचा फायदा मात्र एवढाच झाला की लायब्ररीची वार्षिक वर्गणी भरल्याची पावती दाखविल्याशिवाय सनद मिळत नसल्याने लायब्ररीची थकबाकी कधी राहिली नाही.

पण काहीच परीक्षा न घेता सनदा देण्याची प्रथा योग्य नाही याची जाणीव होऊन सन १९१९ साली एक अभिनव 'Correspondence System' नावची परीक्षा अंमलात आली. याच्या प्रश्नपत्रिका उमेदवाराना अगाऊ मिळत आणि त्याची उत्तरे त्यानी घरी बसून कायदे पाहून लिहून पाठविण्याची मुभा त्यात होती. ओघानेच ही उत्तरे उमेदवारानी स्वतःचे हस्ताक्षरात लिहिली खरी पण ती स्वतःच्याच अकलेने लिहिली नाहीत. इतरांची सरळ सरळ मदत घेतली. या परीक्षेचा हा फार्सवजा प्रकार स्वाभाविकच दोन वर्षात बंद झाला. 'हुजूरून' मर्जीनुसार सनद देण्याची प्रथा मात्र हुजूर कारकीर्द संपेपर्यंत (१९४०) सुरू राहिली. फरक एवढाच की उत्तरोत्तर qualified वकिलांची संख्या वाढत गेल्याने अशा सनदा बहाल करण्याचे प्रमाण पुष्कळ कमी झाले. कारण समजून आले की सनदेने फक्त कोर्टात उभे राहण्याचा तेवढा हक्क मिळतो पण कोर्टात लागणारी खरी पात्रता काही सनद देत नाही. इतके मात्र कबूल केले पाहिजे की या सनदी वकिलापैकी जे मुळात हुषार होते त्यानी कायद्याचा गरजेनुसार अभ्यास केला व त्याला व्यवहार-ज्ञानाची जोड देऊन ते कोर्टात चांगल्यारीतीने निभाऊन गेले. या सगळयाना मान्यवर उपजीविकेचे साधन मिळाले. एक सामाजिक दर्जा व बहुमोल अनुभव मिळाला की ज्या योगे त्याना व अधिकतर त्यांच्या भावि पिढीस चांगला फायदा झाला. आणि या दृष्टीकोणाने दरबारने सुरू केलेली ही प्रथा उपयुक्त ठरली.

### रुचिपालट

## एकवाक्यतेचा पुरावा

एके ठिकाणी एक कोर्ट असे होऊन गेले की त्यांच्यापुढे कोठल्याहि गोष्टीसंबंधी एकमेळाचा तोंडी पुरावा झाला की त्यावर त्यांचा विश्वास हमखास बसे. या कारणाने त्या कोर्टापुढे येणाऱ्या पैक्याच्या दाव्यात फेडीची तक्रार घेऊन दोन तीन एकमेळाचे साक्षीदार केले की तोंडी फेडहि मानली जाई.

ही मर्यादा कोठवर जाती हे पाहण्याची एका वकीलाला एकदा लहर आली.तेव्हा एक साठ रु. च्या येणेबाकीच्या दाव्यात त्या वकीलाने प्र. वा. तर्फे चांगले चार साक्षीदार घेतले आणि त्यांच्या तोंडून वदविले की वीस वीस रुपयाच्या तीन नोटा देऊन प्र. वा. ने फेड केली. यावर वादीतर्फेने तक्रार मांडली की वीस वीस रुपयाच्या नोटा प्रचलित नाहीत; म्हणून साक्षीदारावर कोर्टानी विश्वास ठेऊ नये. कोर्टानी अखेर म्हटले की 'वीस रुपयाच्या नोटा अस्तित्वात नसल्याचे पुराव्यात निष्पन्न झाले नाही व कोर्टास स्वतःचे माहितीचा उपयोग करता येत नाही; अशा स्थितीत प्र. वा. तर्फे झालेल्या एकवाक्यतेच्या पुराव्यावरून मी फेड शाबीत मानतो.'

अपील कोर्टानी हा ठराव फिरविला हा भाग निराळा.

वकिलांचो संघटना फार उशीरा म्हणजे १७।२।२९ ला स्थापन झाली. या उशीराची कारणें पुढील प्रकरणात येतील. याची घटना बरीच उशीरा म्हणजे २८।१।३३ ला पास झाली. हीच संघटना आजतागायत ' The Kolhapur District BAR Association ' या नावानें चालू आहे. संस्थेची स्वतंत्र घटना असून संस्था रजिस्टर्डहि लवकर होणार आहे.

वकिलीच्या धंद्यास लागणारी व अनुषंगिक पुस्तकांची लायब्ररी फार वर्षापासून येथे असून ती प्रथमत: 'स्टेट लॉ लायब्ररी ' म्हणजे सरकारी संस्था होती. त्या कारणाने त्याची व्यवस्था मुख्य न्यायाधीश हे वकिलातील एक चिटणीस घेऊन व लायब्ररीयन सरकारी नोकर नेमून करत होते. विलिनीकरणा-नंतर तिचे रुपांतर डिस्ट्रिक्ट लॉ लायब्ररीत झाले असून त्याचा कारभार घटनेप्रमाणें वकिलांचेकडून पाहिला जातो. मात्र डिस्ट्रिक्ट जज्ज हे लायब्ररीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. १९२९ पूर्वी लायब्ररी व वकिलांची खोली हल्ली जेथे प्रॉसीक्युटर यांचे ऑफिस आहे व रेकॉर्डकीपर बसतात तेथे होती. २।९।२९ ला लायब्ररी व वकिलांची बसण्याची जागा सध्याच्या मोठया जागेत आली.

# २

## गेल्या शतकातील वकील

अशा वकिलांची नावे रेकॉर्डवरून कळतात, पण नावा-पलीकडे मात्र माहिती काही मिळत नाही. या कारणानें फारच थोडया व्यक्तींचाच उल्लेख आम्ही येथे करीत आहोत, त्यास नाइलाज आहे.

१८८० चे सुमारास वकिली करीत असलेले **सदाशिव पांडूरंग उर्फ नाना भिडे** यांचा उल्लेख प्रसिद्ध वकील या व्यतिरिक्त आणखी एका कारणाने करावा लागेल. छत्रपति **शिवाजी महाराजाना** जे आजारी, भ्रमिष्ट वगैरे ठरविण्यात आले होते, ती बाब खरी नसून, त्यात राजकीय कुटिल कार-स्थान होते, अशी त्यांची खात्री झाल्याने त्यानी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने ठिकठिकाणी चळवळ केली. यात त्यांना अखेर कारावास सोसावा लागला. ( याच कारणाकरिता लो. **टिळक व आगरकर** यांनाहि १०१ दिवसांची शिक्षा झाली होती हे वाचकाना माहीत असेलच. )

**विश्वनाथ सखाराम भावे** यानी कोल्हापुरात १८८७ ते ९७ अशी १० वर्षेच वकिली केली. पण ती इतकी यशस्वी की त्यावेळच्या कालातहि त्यानी सुमारे पाऊण लाखाची इस्टेट मागे ठेवली. विशेष हे की ती इस्टेट त्यानी मृत्यूपत्र करून श्री राम संस्थान आळंदी या देवस्थानास दिली. कारण त्यांचा ज्ञानेश्वरीचा व्यासंग फार सखोल होता व ज्ञानेश्वरीची प्रत छापील स्वरुपात प्रथम त्यानी प्रसिद्ध केली. त्यानी निर्माण केलेला ट्रस्ट आजहि चालू आहे.

त्या शतकातील अत्यंत नाणावलेले व प्रसिद्धीस आलेले असे वकील म्हणून **विष्णू कृष्ण राशिंगकर** यांचे नाव घ्यावे लागेल. १८९० पासून १९०७ पर्यंत यानी वकिली केली.कारण प्लेगने ते अकस्मात वारले. या अल्प मुदतीतहि त्यांची बुद्धि-मत्ता, काम चालविण्याची हातोटी, रुबाब या सर्वच बाबतीत त्यांचा नावलौकिक फार मोठा झाला. त्यानी मोठया कीर्ती-बरोबर मोठी कमाईहि मागे ठेवली. त्यानी राजकीय चळवळीत पुढाकार घेतला होता त्याचा उल्लेख पुढे होणार आहे. लो. टिळकांच्या केसपैकी काही साक्षीपुरावा येथे झाला तेव्हा टिळकांनी राशिंगकराना वकीलपत्र दिले होते.

## राष्ट्रीय चळवळीतील पुढाकार

विसाव्या शतकातील वकिलांच्याबद्दल व्यक्तिगत लिहि-ण्यापूर्वी त्यांनी सामुदायिकपणे ज्या राष्ट्रीय चळवळी केल्या व त्याचे कटु परिणामहि भोगले त्याचा आवर्जून उल्ले करणे आवश्यक आहे.

१८८५ साली ब्रिटिश हिंदुस्थानात राष्ट्रीय सभेची काँग्रेसची स्थापना झाली व लोकशाहीचे बीजारोपण झाले त्यानंतरच्या कालात आणि विशेषत: विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून बाहेरील मुलखात स्वदेश प्रेमाची लाट विवि तऱ्हेने उसळली. त्यातून स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्ष व स्वराज्य अशी चतःसूत्री जन्मास आली. या सर्व चळवळी लोण कोल्हापुरात येऊन पोचणे हे अपरिहार्यच होते. विशेष १९०५ च्या बनारसच्या क्रांतिकारक अधिवेशनानंतर त्य प्रतिक्रियेचे दृश्यस्वरूप कोल्हापुरांत उघड होऊं लागले. य संदर्भात जुन्या राजवाड्याजवळ स्वदेशी मालाचे दुका व अभ्यंकर वकिलांचे ( म्युनिसिपालिटी जवळील ) वाड्या एक जाडेभरडे कापड काढण्याचा कारखाना ' महारा वैभालय' या नावाने निघाला याचा उल्लेख करणे जरूर आ कारण या दोन्हीमध्ये पुढाकार व भांडवल अधिकतर वकील वर्गाचेच होते.

पण १९०६ मध्ये पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या धर्तीव लोकमताला वाचा फोडण्याचे हेतूने जी 'लोक प्रतिनिधी नावची सभा स्थापन झाली व त्याचे अधिवेशन दि. २७ सप्टेंब १९०६ ला झाले त्याने तर फारच खळबळ उडाली. हे अधि-वेशन भरण्यास लक्ष्मणराव दिगवडेकर वकिलानी आपल शाहूपुरीतील वखारीची जागा दिली. स्वागताध्यक्ष सुप्रसि राशिंगकर वकील हे होते. ठराव मांडणे व चर्चा याम विशेषत: वकील वर्गाचाच पुढाकार होता ही गोष्ट या सभे तून जी एक कार्यकारी सभा निवडण्यात आली त्याती नावावरून स्पष्ट होईल. सभेत अनेक ठराव झाले. त्या सरकारवर दाबा लावणेची सुभा, म्युनिसिपल कारभा लोकनियुक्त करण्याची मागणी, प्रजेचे गाऱ्हाणे सरकारसमो मांडून दाद लावून घेण्याकरिता एक स्थायीस्वरूपाचे कार्यकारी मंडळाची निवड इत्यादि ठराव होते. या कार्यकारी मंडळा